नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०७/२०२६ (सोमवार )**

---

## अवैध हातभट्टी दारूविरोधात जलालखेडा पोलीसांची विशेष मोहीम, ६ गुन्हे दाखल, २९हजार ६०० रूपयांचा चा मुद्देमाल जप्त मौजा अंबाडा येथे महिलांची जनजागृती बैठक घेऊन अवैध दारूबंदीबाबत जनसहभागाचे आवाहन

नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीला प्रभावी आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १६/०७/२०२६ ते २०/०७/२०२६ या कालावधीत श्री. पराग पोटे, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या नेतृत्वात जलालखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजा अंबाडा, खलान गोंदी, तारा परिसरात विशेष मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मौजा अंबाडा, खलान गोंदी, तारा येथे अवैध हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांविरुद्ध सलग छापे टाकून कारवाई करण्यात आली. या कारवाईत १) एका महिला आरोपी २) संदीप वासुदेवराव गाडगे, ३) दिनेश मारोतराव उभाळे, ४) अरविंद मारोतराव उभाळे आणि ५) भीमराव महादेव कावळे यांच्यासह संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत एकूण ६ गुन्हे नोंदविण्यात आले. सदर कारवाईत पोलिसांनी २५ लिटर गावठी दारू, ५१० लिटर मोहफूल सडवा तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण २९६०० किमतीचा मुद्देमाल जप्त केला. **अवैध दारू तसेच इतर अवैध व्यवसायातील आरोपीतांविरूध्द एमपीडीए आणि हद्दपार सारखी काठोर आणि प्रभावी प्रतिबंधक कारवाई प्रस्तावित आहे.**

दिनांक २०/०७/२०२६ रोजी मौजा अंबाडा, ता. नरखेड येथे महिलांची जनजागृती बैठक आयोजित करण्यात आली. श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी गावातील महिलांशी संवाद साधून अवैध दारू निर्मिती व विक्रीमुळे कुटुंब, समाज तसेच युवकांच्या आरोग्य व भविष्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम सविस्तरपणे स्पष्ट केले. यावेळी महिलांनी गावातील विविध सामाजिक समस्या तसेच अवैध दारूमुळे निर्माण होणाऱ्या कौटुंबिक अडचणी मांडल्या. तसेच गावातील अवैध दारू व्यवसाय बंद करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेऊन पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले.





# अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सक्रिय **आरोपी महेश कोढुरंग गाढवे, वय ४५ वर्ष, रा. रेवराल, ता. मौदा, जि. नागपूर** यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले.

सराईत गुन्हेगार नामे आरोपी **महेश कोढुरंग गाढवे, वय ४५ वर्ष, रा. रेवराल, ता. मौदा, जि. नागपूर याचेवर अवैध दारू बाबत ०८ गुन्हे नोंद आहे**. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृ त्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी **महेश कोढुरंग गाढवे, वय ४५ वर्ष, रा. रेवराल, ता. मौदा, जि. नागपूर यास ०१ महीन्यांकरीता नागपुर ग्रामीण आणि जिल्हयातुन हद्दपार केले आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी महेश कोढुरंग गाढवे, वय ४५ वर्ष, रा. रेवराल, ता. मौदा, जि. नागपूर हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी महेश कोढुरंग गाढवे**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. १ चारचाकी, ६ दुचाकी वाहन, ४ मोबाईल आणि ७८ हजार ७७० रूपये नगदी असा एकुण ७ लाख ५३ हजार ७७० रूपयांचा मुद्देमाल जप्त उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १९/०७/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्तबातमीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड येथे हेवती शिवार रोड च्या बाजुला काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक, उमरेड उपविभाग, यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे १)विनोद शेषराव श्रीखंडे, ३७ वर्षे, रा मकरधोकडा उमरेड,२) अमोल विनोद शिवनकर, वय ३६ वर्षे रा भाग्यश्री नगर खरबी नागपुर,३)मेघराज बापुरावजी गवखरे वय ३९ वर्षे रा प्लॉट १३८ मुगसाजी नगर दिघोरी नागपुर,४) अतुल आनंदराव दुरबुळे वय ३८ वर्षे ,रा धुरखेडा उमरेड ,**हे** जागीच ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. तसेच इतर ६ आरोपी

५)एम एच ४९ बी ए ६०७९ चा चालक, ६) एम एच ४० सीजी ६८५७ चा चालक,७) एम एच ४० ए व्ही ३३०२ चा चालक, ८) एम एच ४० के २११९ चा चालक, ९)एम एच ४० ए डब्लु ७७६७ चा चालक, १०) एम एच ४० ए डी ८७३९ चा चालक हे पोलीसांना पाहुन पळुन गेले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम ७८७७०/—रुपये, ४ मोबाईल किंमती ४५,०००/— रूपये ३) हयुदाई कंपनीची व्हरना क्र एम एच ४० एआर ९०१० कि २,००,०००/—रुपये ४) बुलेट गाडी क्र एम एच ४० सीजी ६८५७ कि १,५०,०००/—रुपये, ५) बजाज पल्सर एम एच ४० ए व्ही ३३०२ कि ७५,०००/—रुपये, ६) स्पेंडर प्लस मो सा क्र एम एच ४० के २११९ कि २५,०००/—रुपये,७) होंडा कंपनीची हॉरनेट एम एच ४० ए डब्लु ७७६७ कि १,००,०००/—रुपये, ८) बजाज डिस्कव्हर क्र एम एच ४० ए डी ८७३९ कि ५५,०००/—रुपये, ९) डिओ मोपेड एम एच ४९ बी ए ६०७९ कि २५,०००/—रुपये, असा एकुण ७,५३,७७०/—रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ६ गोवंश जनावरांची सुटका, २ आरोपी अटक
## अरोली पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन अरोली :— दि. १९/०६/२०२६ रोजीचे अरोली पोलीस ,पोलीस स्टेशन हद्दित पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, अवैद्यरित्या गोवशांची कत्तली करीता वाहतुक होत आहे. अशी माहीती प्राप्त होताच आरोली पोलीसांनी सदर वाहनाची शोध मोहीम सुरू केली असता विरशी शिवरात पांढऱ्या रंगाची झायलो कार क्र. एम.एच. ०१ ए.व्ही. ७७६५ हे वाहन संशयीत रित्या थांबलेले मिळुन आले. आरोपी क्र १) चालक नामे मोहम्मद जलील मो.शकील, वय ३० वर्ष, आणि २) क्लिनर नामे मोहम्मद फैजल अब्दुल कलाम कुरेशी, वय २३ वर्ष, दोन्ही रा. भाजीमंडी,कामठी, जि. नागपुर जागीच मिळुन आले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनाचे मागील डाल्यात ६ गोवंश अत्यंत निर्दयतेने कोंबुन आखुड दोरखंडाने बांधुन जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी क्र १ आणि २) हे वाहन मालक आरोपी ३) परवेज अहमद इजाज अहमद, वय ३० वर्ष, रा. कामठी, जि. नागपुर याच्या सांगण्यावरून अवैधरित्या जनावरांची वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष १) झायलो कार क्र. एम.एच. ०१ ए.व्ही. ७७६५ किंमती ५,००,०००/— रुपये २) ६ गोवंश जनावरे किंमती ६०,०००/— रुपये असा एकुण ५, ६०,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपी यांचे विरुद्ध कलम ११(१),(क) प्राण्यांचा छळ प्रती. अधिनियम सह कलम ५ आय (२),९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६,सह कलम ३(१),१८१ मो.वा.का.प्राणी छळ प्रतिबंधक अधिनीयन अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.




## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १९/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत आरोपी १) **हेमंत देविदास दिवटे, वय २७ वर्ष, रा. पथरई, त. रामटेक, जि. नागपुर हा मौजा करंभाड शिवार, पाईप लाईन रोड येथे** २) **अमित गंगाधर ढोंगे, वय २६ वर्ष, रा. मनसर, त. रामटेक, जि. नागपुर हा मौजा पारशिवनी ते बाबुळवाडा रोडवर भागेमहारी फाटयाजवळ आरोपी** ३) **संदेश ज्ञानेश्वर सोमकुंवर, वय २२ वर्ष, रा. प्रभाग क्र. १७, पारशिवनी त. पारशिवनी, जि. नागपुर हा मौजा पारशिवनी**

**नगर पंचायतच्या मागे धान्य गोडावुन जवळ ४) ललीत नरेंद्र वाघमारे, वय २४ वर्ष, रा. पथरई अंबाझरी, त. रामटेक, जि. नागपुर** हा मौजा पारशिवनी इदगाहच्या मागे गोडावुन जवळ सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २० गुन्हे नोंद

दिनांक १९/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल रसायन सडवा, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण १,४५,९४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) दिनेश मारोतराव उभाळे, वय ४२ वर्ष, रा. खलानगोंदी, ता. नरखेड, जि. नागपूर २) प्रेमराज मनोहर गूजवार, वय ३९ वर्ष, रा. घोगरा, ता. नरखेड, जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल येथे** आरोपी नामे १) करण रमेश गजभिये, वय ३१ वर्ष, रा. पेठबुधवार, ता. काटोल २) शेख ईसराईल शेख जफार, रा. पेठबुधवार काटोल, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी राजकुमार जगलालजी जयस्वाल, वय ५२ वर्ष, रा. चाकडोह यांचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा येथे** १) आरोपी नामे आकाश भिमराव वानखेडे, वय ३० वर्ष, राह. वार्ड क्र. १, पारडी देशमुख, ता. कळमेश्वर, जि. नागपुर २) धनराज विनायकराव चांदुरकर, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, खुमारी, ता. कळमेश्वर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी बलराम छोटेलाल सरेआम, वय ५७ वर्ष, रा. शक्ती नगर, झोपडपट्टी मु. आगेवाडा ता सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी १) वसंता विश्वनाथ धुर्वे, वय ५० वर्षे, रा. वार्ड क्र. ०३, उमरी ता. सावनेर २) जितेन्द्र ज्ञानेश्वर कोल्हे, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ३, नांदागोमुख, ता. सावनेर ३) शेषराव लक्ष्मण शिंदे, वय ६७ वर्ष, रा. केळवद, ता.

सावनेर ४) महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) आकाश ताराचंद गजभिये, वय ३२ वर्ष, रा. उमरी, जां ता. सावनेर, जि. नागपूर २) सुखचंद्र रामजी सोमकुवर, वय ३६ वर्ष, रा. टेकाडी, ता. सावनेर, जि. नागपुर यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे बल्लु श्रावण राठोड, वय ४७ वर्ष, रा. मांडवा याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे विशाल उर्फ टेकचंद नत्थुलाल जयस्वाल, वय ६६ वर्ष, रा.तितुर, ता. कुही याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १३८६० मिली देशी दारू, १९८० मिली विदेशी दारू, ३३ लिटर मोहाफुल दारू, ३६ लिटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य असा एकुण १,४५,९४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने